# कृषि तंत्रनिकेतन सुधारित अभ्यासक्रम
## प्रथम वर्ष
## विषय :- कृषि विस्तार  व ग्रामिण कृषि विकास योजना
## प्रात्यक्षिक

**गुण :- ५०** **तासिका :- २०**

| प्रात्यक्षिक क्रमांक | प्रात्यक्षिकाचे नांव | तासिका |
|---|---|---|
| १. | **विस्तार शिक्षण पध्दती : व्याख्या व विस्तार शिक्षण पध्दतीचे वर्गीकरण**<br>विद्यार्थी संस्थेमध्ये किंवा परिसरात तसेच आसपासच्या भागात असणाऱ्या विविध शिक्षण पध्दतीच्या साधनांची माहिती संकलित करून त्यांचे स्वरूपावरून व उपयोगावरून वर्गीकरण करतील. | ०२ |
| २. | **वैयक्तिक संपर्क : शेतावर अथवा घरी भेट, वैयक्तिक पत्र, दुरध्वनीवर चर्चा, कार्यालयास भेट.**<br>विद्यार्थी संस्थेच्या जवळच्या गावातील शेतकऱ्यांच्या प्रक्षेत्रास व घरी भेट देवून प्रश्नावलीच्या साहाय्याने शेतीविषयक माहिती संकलित करतील. त्याचप्रमाणे ज्या संस्थेच्या जवळ कृषि विभागाचे कार्यालय कार्यरत असेल त्या कार्यालयास भेट देवून कृषि विकास योजनांची माहिती घेतील. | ०२ |
| ३. | **गट संपर्क : गटचर्चा, प्रात्यक्षिक ( कृती व परिणाम ), शैक्षणिक सहल**<br>विद्यार्थी आपआपसात जाहीर वादविवाद, चर्चालेख, वादविवाद सहमत- असहमत चर्चा आयोजित करतील. तसेच शेतकऱ्यांसाठी कोणतेही एक कृषि विषयक कृती प्रात्यक्षिकाचे आयोजन करतील. | ०३ |
| ४. | **समूह संपर्क : प्रदर्शन, मेळावा, दृकश्राव्य, फलक**<br>कृषि विभाग किंवा अशासकीय संस्था यांनी आयोजित केलेल्या प्रदर्शनास भेट देवून, शेतकरी मेळाव्यास उपस्थित राहून त्यासंबंधीची सविस्तर टिपणी तयार करतील. | ०२ |
| ५. | **साधने : तक्ते, आलेख, भित्तीपत्रक, परिपत्रक, घडीपत्रिका, प्रतिकृती, बातमी करणे, मसूदा स्क्रिप्ट तयार करणे, कॅमेरा, मुव्ही कॅमेरा, डिजीटल कॅमेरा, लॅपटॉप, चलचित्रपट, रेडिओ, दुरदर्शन, एल. सी. डी. प्रोजेक्टर माहिती  कार्य व उपयोग** | ०७ |

विद्यार्थी सर्व अप्रक्षेपित व प्रक्षेपित दृक साधनांची माहिती घेवून प्रत्येकाचा नमुना गोळा करतील तसेच कोणतेही एक अप्रक्षेपित दृकसाधन तयार करतील. विद्यालयात आयोजित केलेल्या कार्यक्रमांची बातमी तयार करतील व आकाशवाणीवरील कार्यक्रमासंबंधीचा मसूदा ( स्क्रीप्ट ) तयार करतील. तसेच संस्थेकडे उपलब्ध असलेल्या विविध इलेक्ट्रॉनिक साधनांची माहिती ( कार्य व उपयोग ) घेवून आकृतीच्या स्वरूपात त्याची नोंद प्रात्यक्षिक वहीत करतील व कॅमेरा एल.सी.डी. प्रोजेक्टर विद्यार्थी प्रत्यक्ष चालवून व हाताळून त्याचे ज्ञान घेतील.

६. **सर्वेक्षण : सहभागी ग्रामीण समिक्षण ( पी. आर. अे ) पध्दतीद्वारे ग्रामीण भागाचा सर्व्हे** ०४

दहा विद्यार्थ्यांचा एक गट एका गावाचे सहभागी ग्रामीण समीक्षणाद्वारे निरिक्षण करतील. गावाबददलची सविस्तर माहिती प्रश्नावली, प्रसार फेरी, शिवार फेरी, जुने जानकार व्यक्ती, ग्रामस्थासोबत बैठक, ग्रामसभा तसेच गावासंबंधीच्या शासकीय कार्यालयातील नोंदी यांच्या माध्यमातून गोळा करून गावासंबंधीचा निरिक्षण / पाहणी अहवाल तयार करतील.

----x----